महाराष्ट्र वन विभाग

## मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय

मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) 400 603.
फोन : 022-25329865/ 25329642, फॅक्स 022-25329912.
Email: ccftthane@mahaforest.gov.in / ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in

ISO 9001:2008 Certified by IRQS
MGMT. SYS. RvA C 071

विषय : एकरेषिय (Linear) प्रकल्पांतर्गत Working Permission देण्याबाबत.

**Diversion of 0.035 ha. Mangrove Forest (Unclassified) in favour of Navi Mumbai Municipal Corporation, Navi Mumbai for Providing and laying of Main Sewer line 1400 mm dia from Juinagar to Sanpada STP in Navi Mumbai at village - Sonkhar, Tahsil & Dist-Thane in the State of Maharashtra.**

लिपीक
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मॅंग्रोव्ह)
कांदळवन कक्ष, मुंबई.
17/2/2020

जा.क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.59/19-20/जा.क्र. 659 /19-20
ठाणे - 400 603, दिनांक - 17/02/2020

वाचा:-

1 अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-17/एनसी/आयडी 12720 (68)/57/2019-20दिनांक 18.04.2019.
2 केंद्र शासन पत्र क्र.FC-I/MH-155/2018-NGP/5361, दिनांक 29.05.2019.
3 अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र कक्ष-17/एनसी/आयडी 12720 (68)/1872 दिनांक 12.02.2020.
4 केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-11-306/2014/एफसी, दि. 08.08.2014.
5 केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-1-306/2014/एफसी, दि. 15.01.2015.
6 पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं. 11/306/2014, दि. 07.05.2015.
7 शासन परिपत्रक क्र.एफएलडी-2015/प्र.क्र.77/फ-10, दि.01.07.2015.
8 मुख्य वनसंरक्षक, (मंत्रालय) मुंबई यांचेकडील पत्र क्र.एफएलडी-1116/प्र.क्र.270/फ-10 दिनांक 20.07.2017.

आदेश -

ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडून कार्यकारी अभियंता, नवी मुंबई महानगर पालिका, सेक्टर 15-अ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला जुईनगर ते सानपाडा पर्यंत 1400 मिमी. व्यासाची मल:निसारण वाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत 0.035 हेक्टर अवर्गीकृत कांदळवन जमिन वळतेकरण प्रस्ताव उपरोक्त संदर्भित पत्र क्र.1 अन्वये केंद्र शासनास सादर झाला होता.

आणि ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, नवी मुंबई महानगर पालिका, सेक्टर 15-अ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला वळतेकरण प्रस्ताव, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या तरतुदीनुसार 0.035 हेक्टर वनजमिन वळते करण्याची केंद्रशासनास शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर विचार करुन, राज्य शासनाने सादर केलेल्या प्रस्तावास अ.क्र.2 अन्वये काही अटीं शर्थींच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी, प्रकल्पांतर्गत क्षेत्राच्या बदल्यात प्रस्तावित कांदळवन क्षेत्रावर पर्यायी वनीकरण, नक्त वर्तमान मुल्यांकरिता व इत्यादी प्रयोजना करिता लागणारी अपेक्षित रक्कम प्रकल्प यंत्रणेने Adhoc Campa कडे वर्ग केली आहे. तद्नंतर केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अटी / शर्तींचा पूर्तता अहवाल विहित मार्गाने केंद्रशासनास अ.क्र.3 अन्वये सादर झालेला आहे.

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचीका क्र.87/2006 मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, कांदळवन क्षेत्राच्या संबंधात प्रकल्प यंत्रणेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले नोटिस ऑफ मोशन (एल) क्र.49/2016 मध्ये मा. न्यायालयाने दि.04.02.2016 रोजी निर्णय पारित करून प्रकरण निकाली काढले आहे.

आणि ज्याअर्थी, या प्रकरणात पर्यायी वनीकरण, एनपीव्ही इत्यादी प्रयोजनासाठी परिगणित केलेली रक्कम कॅम्पा प्राधिकरणाकडे वळते होणे, कांदळवन क्षेत्राकामी मा. उच्च न्यायालयाकडून प्रकल्पांतर्गत कांदळवन क्षेत्रात कामे करण्यास परवानगी प्राप्त होणे, केंद्रशासनाकडून प्राप्त झालेल्या तत्वत: मान्यता पत्रातील अटी शर्तींचा पुर्तता अहवाल केंद्र शासनास सादर झालेला आहे. तसेच उपरोक्त अ. क्र.3 अन्वये एकरेषिय प्रकल्पांतर्गत Working Permission देणेबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांनी निर्देश दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावांतर्गत समाविष्ट अवर्गीकृत कांदळवनाचे 0.035 हेक्टर क्षेत्रात Working Permission देण्याची बाब विचारात घेण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अ.क्र.4 व 5 अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेले आहेत. तसेच केंद्रशासनाने वरील अ.क्र.6 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून कामे सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन लाईन, पाण्याची पाईप लाईन, ऑप्टीकल फायबर केबल लाईन, रेल्वे

लाईन इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाचे वरील अ.क्र.7 चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

ज्याअर्थी, कांदळवन कक्षाकडील अशा प्रकरणात आवश्यक अटींची पूर्तता होत असल्यास प्रकल्प यंत्रणेस कामे सुरु करण्यास व झाडे तोडण्याची परवानगी देणेस हरकत नसल्याबाबत अन्य प्रकरणात राज्यशासनाने वरील अ.क्र.8 अन्वये कळविले आहे.

त्याअर्थी, असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच कार्यकारी अभियंता, नवी मुंबई महानगर पालिका, सेक्टर 15-अ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना जुईनगर ते सानपाडा पर्यंत 1400 मिमी. व्यासाची मल:निसारण वाहिनी टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत 0.035 हेक्टर अवर्गीकृत कांदळवन जमिन वळतेकरण प्रस्ताव, खाली दिलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेली आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सादर केलेले प्रकल्प प्रस्तावातील तपशिलात नमूद केलेली 0.035 हेक्टर वळतेकरण क्षेत्राकामी Working Permission देण्यात येत आहे. ही परवानगी केंद्र शासनाच्या उपरोक्त संदर्भित पत्रातील अटी/शर्तींच्या अधिन राहून तसेच खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

१) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत कांदळवन क्षेत्रातील कामे सुरु करण्यापुरती मर्यादित आहे.

२) प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत तत्वत: मान्यता/ विधिवत मान्यता मिळालेल्या दिनांका पासून 6 महिन्याच्या आत प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई यांना सादर करतील.

३) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत वनजमिनीवर काम सुरु करण्यापूर्वी, सबंधित विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांना कळविणे आवश्यक आहे. सबंधित विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित वन जमीनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे, तसेच वनभंग झाला असल्यास, प्रचलित कायद्यानुसार कारवाई करावी.

४) सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून विधीवत मान्यता आणि राज्य शासनाकडून औपचारिक वनक्षेत्र वळते करण्याचे आदेश अप्राप्त आहेत. सदर आदेश / मान्यता देताना घालून दिलेल्या अटीं / शर्ती प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

५) प्रकल्प यंत्रणेकडून कांदळवन क्षेत्रात कामे करतांना कमीत कमी हानी पोहोचेल ही बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

६) मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचीका क्र.87/2006 मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने कांदळवन क्षेत्राच्या संबंधात प्रकल्प यंत्रणेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले नोटिस ऑफ मोशन (एल) क्र.49/2016 मध्ये मा. न्यायालयाने दि.04.02.2016 रोजी पारित केलेल्या निर्णयात घालून दिलेल्या अटी / शर्ती प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील. त्यास अनुसरून प्रकल्पांतर्गत होणा-या कांदळवन वृक्षतोडीच्या बदल्यात वनविभागाच्या देखरेखीखाली पाचपट कांदळवन वृक्ष पुर्नलागवड करणे प्रकल्प प्राधिकरणास बंधनकारक राहील. याबाबत विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई हे खात्री करतील.

७) प्रस्तावांतर्गत कांदळवन क्षेत्रात पट्टेधारक/ पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

८) पर्यावरण व वनमंत्रालयाने वन व वन्यजीव विकास व संवर्धन या दृष्टीने वेळोवेळी घातलेल्या व घालण्यात येणा-या इतर अटी प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

९) प्रकल्पांतर्गत क्षेत्रात कामे करताना नैसर्गिक पाण्याचे मार्ग नदी, नाले, पाण्याचे प्रवाह बंद होणार नाहीत. तसेच वन्यप्राणी यांचे जाण्या-येण्याचे मार्ग बंद होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

१०) प्रकल्पांतर्गत जागेवर कांदळवन पुर्नस्थापना (Restoration Plan) ची अंमलबजावणी करण्याकरीता कांदळवन विभागाकडून आराखडा प्रस्तावित केल्यास सदर आराखड्याचे मूल्य प्रकल्प यंत्रणा भरण्यास तयार असेल.

११) उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) संबंधित उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत दिनांक 25.10.1992 रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना मधील कलम 1.9 नुसार अहवाल सादर करतील.

## <u>अनुसुची</u>

| गावांचे नांव | तालुका | सर्व्हे/ सीटीएस नंबर | वैधानिक दर्जा | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|
| सोनखार | ठाणे | 85 (जुना), 55,56,58,59,60,61 | अवर्गीकृत कांदळवन | 0.035 |
| **एकूण एकंदर** | | | | **0.035** |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

sd/xxx
**(नरेश झुरमुरे)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**

प्रती,

विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई

प्रतिलिपी :- सचिव (वने) मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि कैंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई, ३०२, वेक फिल्ड हाऊस, तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलर्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ यांजकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- कार्यकारी अभियंता, नवी मुंबई महानगर पालिका, सेक्टर 15-अ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२.०० निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश सर्व्हे क्र., क्षेत्र आणि वैधानिक दर्जा आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत. आणि त्याची प्रत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई व मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ,ठाणे यांच्या कार्यालयात देण्यात यावी.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्ष-११ (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी रवाना.

**(नरेश झुरमुरे)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.**